# बृहन्मुंबई महानगरपालिका

## आपत्कालीन व्यवस्थापन विभाग

### पावसाळी परिस्थितीचा अहवाल

### ७ जूलै २०१८ ते ८ जूलै २०१८ सकाळी ८.३० ते ८.३० (२४ तास)

१. पाऊस:

| स्थळ | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ७ जूलै २०१८ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | वार्षिक सरासरी पाऊस (मिमी) | २०१८ पावसाची टक्केवारी | ७ जूलै २०१७ मधील पाऊस (२४ तासांतील) (मिमी) | ७ जूलै २०१७ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | २०१७ टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कुलाबा | ३३.० | १०१९.५ | २१८४ | ४५.६४% | ०.४ | ५९२.५ | २७.१३% |
| सांताक्रुझ | १३१.१ | १२४०.८ | २४५३ | ४९.३४% | ०.० | ७०१.६ | २८.६०% |

२. मनपाच्या स्वयंचलित केंद्रांवर नोंदविण्यात आलेला सरासरी पाऊस:

| विभाग | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ६ जूलै २०१७ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | शहर व उपनगरातील सरासरी पाऊस (मिमी) | मुंबईत झालेला एकुण सरासरी पाऊस (२३७५) (मिमी) |
|---|---|---|---|---|
| शहर | ४९.९४ | ८६१.१० | ३९.४३% | ४३.३२% |
| पूर्व उपनगरे | १३३.५४ | ११५६.५४ | ४३.८८% | |
| पश्चिम उपनगरे | १०७.९५ | ९९६.३३ | | |

३. तापमान:

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| कुलाबा | २८.५ | २४.० |
| सांताक्रुझ | २८.३ | २२.६ |

४. समुद्राची भरती:

| दिनांक | भरतीची वेळ | लाटांची उंची | दिनांक | ओहोटीची वेळ | लाटांची उंची |
|---|---|---|---|---|---|
| ०८.०७.२०१८ | सकाळी ७:४६ | ३.३९ मी. | ०८.०७.२०१८ | दुपारी १:२० | २.१८ मी. |
| ०८.०७.२०१८ | सायंकाळी ७:०७ | ३.५९ मी. | ०९.०७.२०१८ | मध्यरात्री १:५९ | १.२५ मी. |
| ०९.०७.२०१८ | सकाळी ८:५६ | ३.६९ मी. | ०९.०७.२०१८ | दुपारी २:३० | २.१२ मी. |

५. **हवामान अंदाज: कुलाबा वेधशाळेने पुढील २४ तासांकरिता वर्तविलेल्या अंदाजानुसार मुंबई शहर व उपनगरात अधूनमधून पावसाच्या जोरदार सरी पडत राहतील. तसेच एक किंवा दोन ठिकाणी पावसाच्या जोरदार ते अति जोरदार सरी पडण्याची शक्यता आहे.**

Scanned by CamScanner

७. **पाणी साचणे** : शहर व उपनगरात काही ठिकाणी रात्रीपासून अतिवृष्टी होत असल्याने शहरात २, पूर्व उपनगरात २३ व पश्चिम उपनगरात ९ अशा एकुण ३४ ठिकाणाहून नागरिकांकडून पावसाचे पाणी साचले असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी त्वरित संबंधित विभागांना व यंत्रणांना कळवून पर्जन जलवाहिन्यांच्या मार्गिका मोकळ्या करुन तसेच पंपाद्वारे पाण्याचा उपसा करण्यात आला.

८. **घर पडल्याच्या तक्रारी**: पूर्व उपनगरात १ ठिकाणी इमारतीचा / भिंतीचा काही भाग पडल्याची तक्रार प्राप्त झाली. सदर तक्रार संबंधित विभागांना व यंत्रणांना कळविण्यात आली आहे. मार नाही.

९. **दरड कोसळणे**: निरंक

१०. **शॉर्टसर्किट**: शहरात ५, पूर्व उपनगरात २ व पश्चिम उपनगरात ५ अशा एकूण १२ ठिकाणी शॉर्टसर्किट होण्याच्या घटना घडल्या, सदर तक्रारी संबंधित विभागांना व विद्युत पुरवठा यंत्रणांना कळविण्यात आल्या आहेत. उपरोक्त तक्रारींपैकी शहरात दिनांक ०७.०७.२०१८ रोजी दुपारी ०१:४७ च्या सुमारास **पीएमजीपी कॉलनी, मोहिते पाटील नगर, घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, मानखुर्द** येथे शॉर्ट सर्किट होऊन शॉक लागल्याने एक महिला व एक लहान मुलगी जमखी झाले. उपचारार्थ त्यांना जवळच्या कोळेकर या खाजगी रुग्णालयात नेण्यात आले. वैद्यकिय आधिकाऱ्यांनी श्रीमती उषा सावंत, वय ४० वर्षे यांना **मृत घोषित केले** तर समिधा सावंत, वय ५ वर्षे आहे हिला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तीची प्रकृती स्थिर आहे.

११. **झाडे पडण्याच्या तक्रारी**: शहरात ३, पूर्व उपनगरात २ व पश्चिम उपनगरात १५ अशा एकूण २० ठिकाणी झाडे /फांद्या पडण्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विभागांना पडताळण्यासाठी तसेच पुढिल कार्यवाहीकरिता कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

१२. **वाहतुक व्यवस्था : (आज सकाळी ९:०० वा. प्राप्त माहितीनुसार)**

- **पश्चिम रेल्वे** : सकाळी १०:३५ ते दुपारी ३:३५ वाजेपर्यत सांताक्रुझ ते गोरेगांव स्थानका दरम्यान उप तथा डाऊन धिम्या मार्गावरील वाहतुक मेगा ब्लॉक असल्याने बंद राहील. इतर वाहतुक सुरळीत सुरु आहे.
- **मध्य रेल्वे**: गाड्या ३५ ते ४० मिनीटे उशिराने धावत आहेत.
- **हार्बर रेल्वे** : सकाळी ११:१० ते सायं ४:१० वाजेपर्यत कुर्ला ते वाशी स्थानका दरम्यान उप तथा डाऊन मार्गावरील वाहतुक बंद राहील, इतर वाहतुक सुरळीत सुरु आहे
- **बीईएसटी** : वाहतुक सुरळीत सुरु आहे.

१३. **विशेष माहिती**: १) दिनांक ०७.०७.२०१८ रोजी रात्री ९:४७ वा. आरे पाईप लाईन, विजय नगर चेक पोस्ट आणि मोरारजी नगर चेक पोस्टच्या मध्ये, आंबेवाडी, अंधेरी (पू) येथे विहीरीत एक मुलगा पडल्याची माहिती अग्निशमन नियंत्रण कक्षामार्फत प्राप्त झाली. सदर मुलास अग्निशमक दलामार्फत बाहेर काढून सिध्दार्थ रुग्णालयात नेले असता कर्तव्यावरील वैद्यकिय अधिका-यांनी त्यास मृत घोषित केले. मुलाचे नाव विशाल विलास अंबोरे, वय १५ वर्षे असे आहे. याबाबतचा अधिक तपास स्थानिक पोलीसांमार्फत सुरु आहे.

२) दिनांक ०३.०७.२०१८ रोजी अंधेरी रेल्वे स्थानक येथील पूर्व-पश्चिम पादचारी पुलाचा काही भाग रेल्वे रुळावर व बाजुला असलेल्या रस्त्यावर पडला होता. सदर दुर्घटनेमधील ५ जखमींना उपचारार्थ कुपर रुग्णालयात पाठविण्यात होते त्यापैकी **श्रीमती अस्मीता काटकर, वय ३६ वर्षे** यांची प्रकृती गंभीर होती, दिनांक ०७.०७.२०१८ रोजी उपचारादरम्यान त्यांचे निधन झाल्याचे कुपर रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिका-यांमार्फत सांगण्यात आले.

Scanned by CamScanner